सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# इतर मागास बहुजन कल्याण विभाग

# शिष्यवृत्ती अर्ज नोंदणी मार्गदर्शक सूचना (२०२६-२७)

## १. मॅट्रिकपूर्व अभ्यासक्रम (वर्ग १० वी पूर्वीचे शिक्षण घेणारे विद्यार्थी)

### A NSP पोर्टल (नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल) मार्फत अर्ज
(वर्ग ९ वी आणि १० वी चे विद्यार्थी)

| | |
|---|---|
| • योजना | PM YASASVI Pre Matric Scholarship Scheme For OBC, EBC & DNT Students. |
| • पात्रता | इयत्ता ९ वी व १० वी मधील मुले आणि मुली, ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न २.५० लाख रुपयांपेक्षा कमी आहे. |
| • अर्ज नोंदणीची अंतिम तारीख | ३० नोव्हेंबर २०२६ |
| • शाळा स्तरावरुन अर्ज तपासणीची अंतिम तारीख | १५ डिसेंबर २०२६ |

### B महाडीबीटी २.० पोर्टल (MAHADBT 2.0) मार्फत अर्ज (इतर योजना)

| | |
|---|---|
| • सावित्रीबाई फुले योजना | वर्ग ५ वी ते ८ मधील सर्व मुली, तसेच वर्ग ९ वी व १० वी मधील ज्या मुलींच्या पालकांचे उत्पन्न २.५ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे अशा मुलींसाठी. |
| • गुणवत्ता शिष्यवृत्ती (ZP) | माध्यमिक शाळांमधील VJNT व SBC विद्यार्थी. |
| • गुणवंत शिष्यवृत्ती (फक्त मुंबई:) | माध्यमिक शाळांमधील VJNT व SBC विद्यार्थी. |
| • ट्युशन फी व परीक्षा फी भरणे | VJNT किंवा SBC प्रवर्गातील BPL कार्डधारक विद्यार्थी आणि फक्त खाजगी विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित शाळांमधील विद्यार्थी. |
| • सैनिक शाळा भत्ता | सैनिक शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी देखभाल भत्ता. |

## २. मॅट्रिकोत्तर अभ्यासक्रम (१० वी नंतरचे शिक्षण घेणारे विद्यार्थी)

### A NSP पोर्टल (नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल) मार्फत अर्ज

| | |
|---|---|
| • योजना | PM YASASVI Post Matric Scholarship Scheme For OBC, EBC & DNT Students. |
| • पात्रता | • OBC/SBC/VJNT प्रवर्गातील मुले व मुली.<br>• व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेणाऱ्या इतर मागासवर्गीय मुर्ली.<br>टीप- सन 2026-27 या सत्रामध्ये अभ्यासक्रमात नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी.<br>• अट: पालकांचे वार्षिक उत्पन्न एकूण २.५० लाख रुपयांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. |

### B महाडीबीटी २.० पोर्टल (MAHADBT 2.0) मार्फत अर्ज (इतर योजना)

| | |
|---|---|
| • राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती | VJNT व SBC प्रवर्गातील इयत्ता ११ वी व १२ वीचे विद्यार्थी. |
| • निर्वाह भत्ता | व्यावसायिक अभ्यासक्रमात शिकणारे व व्यावसायिक महाविद्यालयांशी संलन वसतीगुहात राहणारे VJNT व SBC विद्यार्थी. |
| • व्यावसायिक प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती | इमाव, विमाग्र व विजाभज प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी. |
| • शिक्षण व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती (Freeship) | (उत्पन्न मर्यादा २.५० लाख ते नॉन क्रिमिलियर मर्यादेपर्यंत). |
| • व्यावसायिक प्रशिक्षण शुल्क परतफेड | शासकीय किंवा खाजगी आयटीआय (ITI) मध्ये प्रवेश घेणारे OBC, VJNT व SBC प्रवर्गातील विद्यार्थी. |
| • नूतनीकरण (Renewal) अर्ज | मागील सत्रात (२०२५-२६) भारत सरकार शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेले आणि चालू शैक्षणिक सत्रात (२०२६-२७) त्याच महाविद्यालयात दुसरे, तिसरे किंवा चौथे वर्ष असणारे विद्यार्थी, यांनी आपले नूतनीकरण अर्ज पूर्ववत महाडीबीटी पोर्टलवर भरावेत. |

**महत्त्वाचे आवाहन :** संबंधित शाळा, विद्याल्न आणि महाविद्यालयांच्या मुख्याध्यापकांनी/प्राचार्यांनी आपल्या स्तरावरुन वरील सर्व योजनांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावी आणि वेळेत अर्ज नोंदणी करून मेघासावी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करावे.

शिक्षण घ्या... प्रगती करा...
शिष्यवृत्ती तुमच्या उज्ज्वल भविष्यासाठी !

सर्व विद्यार्थ्यांना शासकीय योजनेचा लाभ घ्या !



## महत्त्वाची सूचना: शिष्यवृत्ती (Scholarship) अर्ज भरण्याबाबत शैक्षणिक वर्ष २०२६-२७

कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांमधील **OBC, SBC, आणि VJNT (विजाभज)** प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी केंद्र व राज्य शासनामार्फत शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. यावर्षी अर्ज भरण्याच्या पद्धतीत महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत.

---

- **१. केंद्र शासनाची 'PM-YASASVI' योजना (अर्ज फक्त NSP पोर्टलवर भरावेत)**
  खालील ४ योजनांचे नवीन (Fresh) अर्ज फक्त National Scholarship Portal (NSP) वरच स्वीकारले जातील. हे अर्ज महाडिबीटी (MahaDBT) पोर्टलवर भरता येणार नाहीत:
- **इमाव (OBC)** प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोतर शिष्यवृत्ती.
- **विमाप्र (SBC)** प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोतर शिष्यवृत्ती.
- **विजाभज (VJNT)** प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोतर शिष्यवृत्ती.
- व्यवसायिक **अभ्यासक्रमात** प्रवेश घेतलेल्या इतर मागासवर्गीय **मुलींसाठी** मॅट्रिकोतर शिष्यवृत्ती.
  📅 **अर्ज करण्याची अंतिम मुदत: ३० नोव्हेंबर २०२६** पर्यंत.

---

**२. राज्य शासनाच्या योजना (अर्ज नेहमीप्रमाणे महाडिबीटी पोर्टलवर भरावेत)**
**खालील ७ योजनांचे अर्ज पूर्ववत MahaDBT पोर्टलवर भरण्यात यावेत:**

- **राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती:** VJNT व SBC प्रवर्गातील ११ वी आणि १२ वीचे विद्यार्थी.
- **निर्वाह भत्ता:** व्यावसायिक अभ्यासक्रमात शिकणारे आणि संलग्न वसतिगृहात (Hostel) राहणारे VJNT व SBC विद्यार्थी.
- **शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती (Free-ship):** OBC, SBC, आणि VJNT प्रवर्गातील सर्व पात्र विद्यार्थी.
- **व्यावसायिक प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती:** शासकीय किंवा खाजगी ITI मध्ये प्रवेश घेतलेले OBC, VJNT व SBC विद्यार्थी.

---

⌛ **महत्त्वाच्या तारखा (NSP पोर्टलसाठी):**

- **अर्ज भरण्याची शेवटची तारीख:** ३०.११.२०२६
- **महाविद्यालयीन पडताळणी (Institute Verification):** १५.१२.२०२६ पर्यंत
- **त्रुटी असलेले अर्ज दुरुस्त करणे (Defective Application):** १५.१२.२०२६ पर्यंत

⚠️ **टीप:** सर्व पात्र विद्यार्थ्यांनी मुदतीपूर्वी आपले अर्ज १००% अचूक भरून प्रिंट अर्जदाराच्या स्वाक्षरीने व अपलोड केलेल्या document प्रिंट self attested करून महाविद्यालयात सादर करावेत, जेणेकरून शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यात कोणतीही अडचण येणार नाही.

Ref: SU/SET(DOT)/
Date:- 16.10.2026

SHIVAJI UNIVERSITY
School of Engineering & Technology, Kolhapur

Director
School of Engineering & Technology,
Shivaji University, Kolhapur

महाराष्ट्र शासन
सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, कोल्हापूर.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, विचारे माळ, कोल्हापूर.
E-mail:-adobckolhapur@gmail.com

जा.क्र/ससंइमाबको/पीएमयशस्वी/२०२६-२७/ दि. /१०/२०२६

प्रति,

प्राचार्य,

सर्व महाविद्यालये,कोल्हापूर जिल्हा.

विषय- "PM-YASASVI POST MATRIC SCHOLARSHIP FOR OBC, EBC AND DNT STUDENTS या योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती अर्ज भरणेबाबत.

संदर्भ- मा. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय,महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील पत्र जा.क्र.५८७३ दि.१३.१०.२०२६

**महोदय,**

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी "PM-YASASVI POST MATRIC SCHOLARSHIP FOR OBC, EBC AND DNT STUDENTS या योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती अर्ज केवळ NATIONAL SCHOLARSHIP PORTAL (NSP) वरूनच स्वीकारण्यात येणार आहेत.

संदर्भीय पत्रानुसार खालीलप्रमाणे या कार्यालयास सूचना प्राप्त आहेत.

PM YASASVI Post Matric Scholarship Scheme For OBC, EBC & DNT Students-

१. इमाव (OBC) च्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोतर शिष्यवृत्ती

२. विमाप्र (SBC) च्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोतर शिष्यवृत्ती.

३. विजाभज (VJNT) च्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोतर शिष्यवृत्ती.

४. व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेणाऱ्या इतर मागासवर्गीय मुलींसाठी मॅट्रिकोतर शिष्यवृत्ती.

वरील चार योजनांसाठीचे फ्रेश अर्ज केवळ NSP पोर्टलवरच करावेत. यासाठी नवीन अर्ज करण्याची सुविधा महाडिबीटी पोर्टलवर असणार नाही याची गांभीयाने नोंद घेवून या योजनांसाठीचे अर्ज NSP पोर्टलवर भरण्याच्या सूचना आपले महाविद्यालयामार्फत सर्व विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.

**महाडिबीटी पोर्टलवर अर्ज सादर करावयाच्या योजना-**

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती VJNT व SBC प्रवर्गातील इयता ११ वी व १२वी विद्यार्थी

२. व्यावसायिक अभ्यासक्रमात शिकणारे व व्यावसायिक महाविद्यालयांशी संलग्न वसतिगृहात राहणारे VJNT व SBC विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता.

३. इमाव, विमाप्र व विजाभज प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती योजना.

४. इमाव (OBC) विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना

५. विमाप्र (SBC) विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना

६. विजाभज (VJNT) विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना

७. व्यावसायिक प्रशिक्षण शुल्काची परतफेड OBC, VJNT व SBC, प्रवर्गातील विद्यार्थी. (शासकीय किंवा खाजगी आयटीआय मध्ये प्रवेश घेणारे विद्यार्थी यांचे करिता)

वरील सात योजनांचे अर्ज पूर्ववत महाडिबीटी पोर्टलवर भरण्यात यावेत.

तसेच या पत्राद्वारे महाविद्यालयाच्या सर्व प्राचार्य यांना कळविण्यात येते की, सन २०२६-२७ करीता सदर योजनांचे अर्ज नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर भरण्याकरीता केंद्र शासनामार्फत विहित कालावधी खालील प्रमाणे निश्चित करण्यात आला आहे.

| Scheme Open From | Student Application Open Till | Defective Application Verification Open Till | Institute Verification Open Till | DNO/SNO/MNO Verification Open Till |
|---|---|---|---|---|
| १७.०७.२०२६ | ३०.११.२०२६ | १५.१२.२०२६ | १५.१२.२०२६ | ३१.१२.२०२६ |

सदर योजनेकरीता संबंधित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अर्ज करण्याची अंतिम मुदत दि.३०.११.२०२६ पर्यंत आहे. त्याअनुषंगाने सदर योजनेचे अर्ज करण्याबाबतची कार्यपध्दती नुसार १०० टक्के पात्र विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर भरण्यात येतील याची खबरदारी घेण्यात यावी.

वरील सूचनांची सर्व संबंधित महाविद्यालयांनी तात्काळ नोंद घेऊन महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांना व पालकांना याबाबत आवश्यक ती माहिती देऊन तदनुसार कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात व त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास देण्यात यावा.

**आपली विश्वासू,**

(सुनिता नेर्लीकर)

**सहायक संचालक,**

**इतर मागास बहुजन कल्याण ,कोल्हापूर.**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर-**

१. मा. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय,महाराष्ट्र राज्य पुणे

२.मा.प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण, प्रादेशिक ( विभाग) पुणे.